4

ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 12 ]
Total No. of Printed Pages : 12 ]
ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 48 ]
Total No. of Questions : 48 ]

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 85-M**
**Code No. : 85-M**

**C**

**CCE PR**
**REVISED**
**FULL SYLLABUS**
**NSR & NSPR**

**Question Paper Serial No. 712**

# ವಿಷಯ : ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ ( समाज विज्ञान )
# Subject : SOCIAL SCIENCE

**( ಮರಾಠಿ ಮಾಧ್ಯಮ / Marathi Medium )**
**(ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಎನ್.ಎಸ್.ಆರ್. & ಎನ್.ಎಸ್.ಪಿ.ಆರ್.)**
**( Private Repeater / NSR & NSPR )**

ದಿನಾಂಕ : 15. 06. 2023 ] [ Date : 15. 06. 2023
ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 10-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-30 A.M. to 1-45 P.M.
ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 ] [ Max. Marks : 100

**विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :**

1. प्रश्नपत्रिकेमध्ये वस्तुनिष्ठ आणि विषयनिष्ठ प्रकारचे 48 प्रश्न आहेत.
2. प्रश्नपत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती प्रश्नपत्रिका उघडावयाची आहे. प्रश्नपत्रिकमधील सर्व प्रश्न असलेली पाने व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पहा.
3. वस्तुनिष्ठ आणि विषयनिष्ठ प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या ही त्या प्रश्नाचे पूर्ण गुण दर्शविते.
5. प्रश्नांची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्नपत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

येथून कापा.

TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER
प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.

Tear here

**I. खालील प्रत्येक प्रश्नाला किंवा अपूर्ण वाक्यांशाला चार बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. बरोबर असलेला पर्याय निवडून त्याच्या इंग्रजी मुळाक्षरासह पूर्ण उत्तर दिलेल्या उत्तर पत्रिकेमध्ये लिहा : 8 × 1 = 8**

1. दुसरे अँग्लो-मराठा युद्ध या तहाने संपुष्टात आले.

   (A) सालबाईचा तह

   (B) लाहोरचा तह

   (C) बासेन ( वसई ) चा तह

   (D) मद्रासचा तह

2. बेंगळूरू-म्हैसूर रेलवे मार्ग निर्माण करण्याचे श्रय यांना दिले जाते.

   (A) जयचामराज वडेयर

   (B) चौथा कृष्णराज वडेयर

   (C) दहावा चामराजेंद्र वडेयर

   (D) राजा वडेयर

3. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या ( UNO ) सुरक्षा समितीत भारताला कायमचे सदस्यत्व मिळावे. यासाठी हा देश प्रयत्नशील आहे.

(A) अमेरिका ( USA ) (B) ब्रिटन

(C) रशिया (D) फ्रान्स

4. सर्व शिक्षण अभियानाच्या ( SSA ) या कार्यक्रमांतर्गत कर्नाटकातील बालकामगाराना शाळेत परत आणले जाते.

(A) शाळेत परत या (B) मजूरीहून शाळेकडे

(C) कली नली (D) नली कली

5. नदीखोऱ्यातील ही बहुउद्देशीय योजना सतलज नदोवर बांधली आहे.

(A) भाक्रा-नानगल योजना (B) हीराकुड योजना

(C) पंपासागर (D) नागार्जुन सागर योजना

6. भारताचे सिलीकॉन सीटी हे आहे.

(A) मुंबई (B) चेन्नई

(C) दिल्ली (D) बेंगळूरू

7. बँकेकडून नागरिकाना आपल्या अमूल्य वस्तू आणि दागिने सुरक्षित ठेवब्यासाठी ही सेवा दिली जाते.

(A) बचत खाते सेवा (B) सेफ डिपॉझिट लॉकर सेवा

(C) मुदत ठेव सेवा (D) चालू खाते सेवा

8. मुख्यतः विकसनशील देशांद्वारे या प्रकारचे अंदाज पत्रक ( budget ) सादर केले जाते.

(A) स्थिर अंदाजपत्रक

(B) तूटीचे अंदाजपत्रक

(C) संतुलित ( समतोल ) अंदाजपत्रक

(D) अतिरिक्त ( शिल्लकीचे ) अंदाजपत्रक

**II. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तर लिहा : 8 × 1 = 8**

9. इटलीतील 'राष्ट्रीय फॅसिस्ट पक्षाचा' संस्थापक कोण ?

10. तीन मूर्ती भवन चे महत्व काय ?

11. 'मानव हक्क दिवस' कोणत्या दिवसी साजरा करतात ?

12. महात्मा गांधीजीनी अस्पृश्यतेला काय म्हटले ?

13. भारतातील अती कमी पाऊस पडणारे ठिकाण कोणते ?

14. स्त्री भ्रूण हत्या म्हणजे काय ?

15. प्रत्यक्ष कर म्हणजे काय ?

16. कोणते खाते 'राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र' वितरित करते ?

**III. खालील प्रश्नांची प्रत्येकी दोन ते चार वाक्यात / मुद्यात उत्तर लिहा :**

**18 × 2 = 36**

17. युनेस्कोचे ( UNESCO ) कार्य कोणते ?

**किंवा**

आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या राष्ट्रातील वसाहत शाहीची प्रमुख लक्षणे कोणती ?

18. सामाजिक स्तर देशानुसार कसा भिन्न आहे ?

**किंवा**

'शांतदरी चळवळ' ( सायलेंट व्हैली आंदोलन ) का करण्यात आले ?

19. तीसऱ्या अँग्लो-मराठा युद्धाचे परिणाम कोणते ?

20. पोर्तुगीजांच्या ताब्यातून गोवा कसा मुक्त झाला ?

21. चहा पिक वाढीसाठी आवश्यक असलेले घटक कोणते ?

22. दळणवळणाचे ( संपर्क माध्यमे ) महत्व कोणते ?

23. 'उद्योजकता' ही एक सृजनात्मक प्रक्रिया आहे. कशी ?

24. पंचवार्षिक योजनेचे उद्देश कोणते ?

25. वॉरन हेस्टींग्जने अंमलात आणलेल्या न्यायालयांची नावे लिहा.

26. स्वातंत्र्यानंतर भारत कोणत्या समस्याना सामारे जात आहे ?

27. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील प्रमुख क्रांतीकारकांची नावे लिहा.

28. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर जगाला कोणत्या समस्याना सामोरे जावे लागले ?

29. अन्न आणि कृषी विषयक संघटनेचे ( F.A.O. ) उद्देश कोणते ?

30. भारतातील पर्यावरण संरक्षणासाठी असलेल्या पर्यावरण चळवळींची नांवे लिहा.

31. भारतातील हवामानाचे चार ऋतू लिहा.

32. पारंपरिक ऊर्जा संसाधनांची नावे लिहा.

33. कोणत्याही दोन आवास योजना लिहा.

34. ग्राहक न्यायालयाच्या तीन पायऱ्या लिहा.

**IV. खालील प्रश्नांची प्रत्येकी सहा वाक्यात / मुद्यात उत्तरे लिहा : 9 × 3 = 27**

35. प्लासीच्या लढाइची कारणे आणि परिणाम लिहा.

**किंवा**

सहाय्यक सैन्य पद्धत स्वीकारलेल्या राज्यांना कोणत्या अटी पाळाव्या लागत ?

36. भारतीयांना हिमालयाचा उपयोग कसा होतो ?

**किंवा**

सध्याच्या दिवसात मातीची धूप आम्ही कशी थांबवितो ?

37. ग्रामीण विकासात पंचायत राज संस्थेची भूमिका कोणती ?

**किंवा**

सार्वजनिक अर्थव्यवस्थेचे महत्व थोडक्यात वर्णन करा.

38. बँक खाते उघडण्यासाठी अवलंबिल्या जाणाऱ्या पायऱ्या कोणत्या ?

**किंवा**

ग्राहक संरक्षण कायद्याचे उद्देश कोणते ?

39. प्रार्थना समाजाच्या सुधारणांचे वर्णन करा.

40. भारतीय स्वातंत्र्याचे पहिले युद्ध अपयशी ठरले याची कारणे कोणती ?

41. भारत आणि अमेरिका ( U.S.A. ) यांच्या संबंधाचे वर्णन करा.

42. अती जास्त लोकसंख्या असलेल्या भारतातील बेरोजगाराची समस्या आम्ही कशी सोडवू शकतो ?

43. चक्रीवादळाचे प्रतिबंधात्मक उपाय कोणते ?

**V. खालील प्रश्नांची प्रत्येको आठ वाक्यात / मुद्यात उत्तर लिहा : 4 × 4 = 16**

44. ब्रिटिश शिक्षणाचा भारतीयांच्यावर परिणाम झाला. याचे समर्थन करा.

**किंवा**

''म्हैसूर संस्थानाच्या विकासात चौथा कृष्णराज वडेयर यांचे योगदान फार आहे.'' या वाक्याचे समर्थन करा.

45. ''डॉ. बी. आर. आंबेडकर हे थोर समाज सुधारक होते.'' समर्थन करा.

46. भारतात साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी सरकारने कोणते उपाय हाती घेतले आहेत ?

47. भारतातील अरण्यांचे संरक्षण करण्यासाठी कोणते उपाय हाती घेतले आहेत ?

**VI.** 48. **भारताच्या नकाशाचा आराखडा काढा आणि त्यामध्ये खालील ठिकाणे दाखवा :** **1 + 4 = 5**

a) दामोदर दरी

b) भद्रावती

c) कांडला

d) बेंगळूरू

**अंध विद्यार्थ्यांसाठी पर्यायी प्रश्न : ( प्रश्न संख्या 48 च्या ऐवजी )**

नदी खोऱ्यातील बहुउद्देशीय योजनेचे प्रमुख उद्देश कोणते ? **5**